कोणास काही हरकत असल्यास, संबंधित दावा करणाऱ्या व्यक्तीने या सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह आपला दावा अधोलिखितांकडे नोंदवावा. अन्यथा, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही स्वरूपाचे दावे आणि/किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशील अनुसूचित मालमत्तेच्या विक्रीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढे कार्यवाही करतील.

येथे वर संदर्भित अनुसूची

संत मुक्ताबाई रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७ येथे स्थित फोरफ्रंट प्रायमेरिया (प्रकाश इच्छापूर्ती सीएचएस लि.) या इमारतीतील फ्लॅट क्र. ३०२, विंग 'ए', तिसरा मजला, रेरानुसार ७५७ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळाचा आणि एमसीजीएमनुसार ७८२ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळाचा (यापुढे सदर फ्लॅट असा उल्लेख) (बाल्कनीचे क्षेत्रफळ वगळून), तसेच एक कार पार्किंग जागेसह (यापुढे सदर कार पार्किंग जागा असा उल्लेख), दोन बेडरूम, हॉल व किचन असलेला निवासी फ्लॅट, जे प्लॉट क्र. ३२०, सर्व्हे क्र. ११८, हिस्सा क्र. १३ (भाग) असलेल्या मुक्तधारक जमिनीवर उभारलेल्या इमारतीत स्थित आहे, सदर जमीन सुमारे २०१० चौरस याईर्स म्हणजेच १६८०.६२ चौरस मीटर किंवा त्याच्या आसपास क्षेत्रफळाची असून, विले पार्ले टाउन प्लॅनिंग स्कीम क्र. त अंतर्गत येते व मुंबई शहर नोंदणी जिल्हा आणि मुंबई उपनगर उपजिल्हा हद्दीत, विले पार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७ येथे स्थित आहे. टाउन प्लॅनिंग योजनेनुसार, वरील जमिनीचे वर्णन नंतर बदलून, सुमारे १५८८.७० चौरस मीटर किंवा त्याच्या आसपास क्षेत्रफळ असलेली, गाव विले पार्ले (पूर्व) येथील सी.टी.एस. क्र. १५७० व अंतिम प्लॉट क्र. २९१ (यापुढे सदर प्लॉट म्हणून संदर्भित) अशी करण्यात आली, सदर प्लॉटसह त्यावरील सदर सोसायटीची इमारतही समाविष्ट असून, ती विले पार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७ येथे स्थित, अस्तित्वात व वसलेली आहे.

ठिकाण: मुंबई — **सही/- ॲड. हिना एच. सरवैया**
दिनांक: ०३.०६.२०२६ — **वकील, मुंबई उच्च न्यायालय**
फ्लॅट क्र. ए/३०२, ३रा मजला, कमल अपार्टमेंट, आझाद रोड, फायर ब्रिगेडच्या शेजारी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते व खाली अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींना काही हक्क, शिर्षक, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास ते सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येते की, माझ्या अशील सौ. जाहिदा अब्दुल मजीद शेख या २६९ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळ असलेल्या निवासी सदनिकेच्या, म्हणजेच फ्लॅट क्र. १७१६, १७ वा मजला, बी विंग, के. डी. हाईट्स-३ एस.आर.ए. को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, इमारत क्र.३, खोत डोंगरी, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई - ४०००९७ येथील सदनिकेच्या एकमेव व संपूर्ण मालक आहेत, जे गाव मालाड (पूर्व), तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर येथील सी.टी.एस. क्र. ५२१ ते ५३३, ५३६ व ५३७ असलेल्या जमिनीवर स्थित आहे (यापुढे सदर फ्लॅट असा उल्लेख करण्यात येईल).

माझ्या अशीलांचे पती दिवंगत श्री. शेख अब्दुल मजीद रईस हे एस.आर.ए. योजनेअंतर्गत सदर फ्लॅटचे मूळ वाटपधारक होते, त्यांचे दि. २३.०२.२०१६ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात सौ. जाहिदा अब्दुल मजीद शेख (पत्नी), सौ. शबाना हिलाल कामले (पूर्वाश्रमीच्या शबाना अब्दुल मजीद शेख) (मुलगी) आणि कु. राणी अब्दुल मजीद शेख (मुलगी) हे कायदेशीर वारस राहिले आहेत.

सदर मुलगी, म्हणजे सौ. शबाना हिलाल कामले (पूर्वाश्रमीच्या शबाना अब्दुल मजीद शेख) आणि कु. राणी अब्दुल मजीद शेख यांनी त्यांच्या आई सौ. जाहिदा अब्दुल मजीद शेख यांच्या पक्षात बिनशर्त संमती व ना-हरकत पत्र दिले असून, सदर फ्लॅटमधील त्यांचे सर्व हक्क, हिस्सा व हितसंबंध त्यागून व मुक्त करून दिले आहेत.

त्यानुसार, कायद्याने विहित केलेली प्रक्रिया पूर्ण करून तसेच सर्व आवश्यक औपचारिकता पार पाडल्यानंतर, सदर फ्लॅट सौ. जाहिदा अब्दुल मजीद शेख यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आलेला असून त्यांची नोंद करण्यात आलेली आहे. त्या आता सदर फ्लॅटच्या एकमेव व संपूर्ण मालक आहेत.

कोणा व्यक्तीस किंवा व्यक्तींना सदर फ्लॅटसंदर्भात वारसा, उत्तराधिकार, गहाण, भार, धारणाधिकार, भेट, वहिवाट, सुखसोयी किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, मागणी, हरकत, हक्क, शिर्षक, हितसंबंध किंवा लाभ असल्यास, त्यांनी त्या दाव्याच्या समर्थनार्थ आवश्यक कागदोपत्री पुराव्यांसह आपला दावा/हरकत या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून सात (७) दिवसांच्या आत अधोलिखितांकडे लेखी स्वरूपात सादर करावा, अन्यथा, असा दावा असल्यास तो कायमस्वरूपी माफ, परित्यक्त आणि/किंवा त्याग केलेला मानण्यात येईल.

सही/-
वकील **इमरान सिद्दिकी**
५५/३४९, संकेत कोहौसो, एम.एच.बी. कॉलनी, दिंडोशी नगर,
ठिकाण: मुंबई — मालाड (पूर्व), मुंबई - ४०००९७, मोबा.९९६७८६१६६०
दिनांक: ०१.०६.२०२६ — **सौ. जाहिदा अब्दुल मजीद** शेख यांचे वकील

CEENIK EXPORTS (INDIA) LTD.

CIN: L51311MH1995PLC085007
Regd. Office: 05th Floor, 14 - B, Jeevan Satyakam, Dr. Ambedkar Road, Bandra West, Mumbai, Maharashtra, India, 400050. **Tel:** 91-2246187866
Email: - ceenikexports@gmail.com; **Website:** www.ceenikexports.in

POSTAL BALLOT NOTICE

Notice is hereby given that **Ceenik Exports (India) Limited ('the Company')** is seeking approval of its members by way of Postal Ballot through remote e-voting as set out in the Notice dated June 2, 2026.

The Postal Ballot Notice **('the Notice')** is available on website of the Company at https://www.ceenikexports.in/ , the e-voting system link of NSDL i.e., at https://eservices.nsdl.com and on the website of the Stock Exchange where the securities of the Company are listed i.e. BSE Limited at https://www.bseindia.com/

In compliance of General Circular No. 14/2020 dated April 08, 2020 and General Circular No. 17/2020 dated April 13, 2020 read with other relevant circulars issued in this regard, the latest being General Circular No. 03/2025 dated September 22, 2025 (issued by the Ministry of Corporate Affairs ("General Circulars") ("MCA Circulars"), the Company has sent the Notice in electronic form to those Members, whose names appear in the Register of Members / List of Beneficial Owners as received from the Depositories / MUFG Intime India Private Limited, the Company's Registrar and Transfer Agent **('RTA')** as on May 29, 2026 **('Cut-Off Date')** and whose e-mail addresses are registered with the Company/RTA / Depositories / Depository Participants (in case of electronic shareholding) or who will register their e-mail address in accordance with the process outlined in the Notice sent to the members. The communication of the assent or dissent of the Members would only take place through the remote e-voting system. The voting rights of the Members shall be in proportion to their share of the paid-up equity share capital of the Company as on the Cut-Off date.

The Company has engaged the services of NSDL for the purpose of providing remote e-voting facility to its members. The remote e-voting shall commence on, Wednesday, June 3, 2026 (9.00 a.m. IST) and ends on Thursday, July 2, 2026 (5.00 p.m. IST). During this period, Members of the Company holding shares in physical or electronic form as on the Cut-Off Date may cast their vote electronically. The remote e-voting module shall be disabled for voting thereafter.

All investor can follow the instruction kit of NSDL for process of E-voting and email can be sent to evoting@nsdl.com, if any query for the same. Further M/s Dilip Swarnkar & Associates, Company Secretaries, has appointed as Scrutinizer for conducting the e-voting process in a fair and transparent manner.

The Scrutinizer will submit his report to the Chairman of the meeting after completion of scrutiny of the e-voting. The results will be uploaded on the website of BSE and Company Website, not later than two working days from the closure of the e-voting.

By Order of Board,
For Ceenik Exports (India) Limited
Sd/-
Narain Nanik Hingorani
Date: 02-06-2026 — **Managing Director**
Place: Mumbai — **DIN - 00275453**

वसुली अधिकारी यांचे कार्यालय

दि ग्रेटर बॉम्बे को-ऑपरेटिव्ह बँक लि., जितो हाऊस, १ला मजला, प्लॉट क्र. ५६, रोड क्र. १, एमआयडीसी, इंटरनॅशनल बाय तुंगा हॉटेल शेजारी, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३ यांच्या आवारात. दूरध्वनी : ०२२-६१२८५७१६ / २९

जीबीसीबी/एसएडी/आरओ/एसबीए/८६ /२०२६ — दिनांक: २७ मे २०२६

दि. ३१ ऑगस्ट १९९८ पासून खाली नमूद केलेल्या जजमेंट डेब्टर्स, म्हणजेच मे. श्री गणेश कॉर्पोरेशन व इतर, मे. श्री गणेश फॅब्रिक्स व इतर आणि मे. श्री गणेश टेक्सटाईल्स व इतर, पत्ता : ७५०, सर विठ्ठलदास गल्ली, एम. जे. मार्केट, मुंबई - ४०० ००२ यांनी घेतलेल्या रोख कर्ज सुविधा / मुदत कर्ज सुविधांच्या संदर्भात; तसेच सदर कर्जाची वेळेवर परतफेड व सेवा करण्यात झालेल्या गंभीर दुर्लक्ष व अपयशामुळे खाते अनुत्पादित मालमत्ता बनल्याच्या संदर्भात; आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५६ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम १०७ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे राबविण्यात येत असलेल्या आर.सी. प्रकरण क्र. १७८८/२०००, १७८६/२०००, १७८५/२००० व १७९१/२००० मधील अंमलबजावणी कार्यवाहीच्या संदर्भात.

१) दि ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि. (अनुसूचित बँक) ... हुकूमनामा धारक बँक

विरुद्ध

१. मे. श्री गणेश कॉर्पोरेशन आणि इतर ७५०, सर विठ्ठलदास गल्ली, एम.जे. मार्केट, मुंबई - ४०० ००२. ... नोटीसदार / न्यायनिर्णय-कर्जदार

२) दि ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि. आणि इतर (अनुसूचित बँक) ... हुकूमनामा धारक बँक

विरुद्ध

१. मे. श्री गणेश फॅब्रिक्स आणि इतर ... नोटीसदार / न्यायनिर्णय-कर्जदार

३) दि ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि. (अनुसूचित बँक) ... हुकूमनामा धारक बँक

विरुद्ध

१. मे. श्री गणेश टेक्सटाईल्स आणि इतर ... नोटीसदार / न्यायनिर्णय-कर्जदार

ज्याअर्थी,

सुरू असलेल्या वसुली कार्यवाहीमध्ये, वरील न्यायनिर्णय-कर्जदारकडून प्रलंबित असलेल्या मोठ्या व दीर्घकालीन डिक्री रकमेच्या वसुलीसाठी दि.१७ सप्टेंबर २००३ रोजीच्या जप्ती आदेशान्वये न्यायनिर्णय-कर्जदार श्री. प्रकाश आर. बलार यांचे बँक ऑफ बडोदा - डोंबिवली (पूर्व) शाखेतील बँक खाते व सुरक्षित ठेव लॉकर जप्त करण्यात आले आहे.

सदर जप्ती आदेशामुळे बाधित झाल्याने कु. शिल्पा प्रकाशचंद बलार, कु. सोनल प्रकाशचंद बलार आणि सतीश प्रकाशचंद बलार (अर्जदार) यांनी दि. १७ सप्टेंबर २००३ रोजीच्या सदर जप्ती आदेशास आव्हान देण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २००३ रोजी पुनर्विलोकन प्राधिकरणासमोर पुनर्विलोकन अर्ज क्र. ७२६/२००३ दाखल केला. सदर पुनर्विलोकन अर्जामध्ये अर्जदारांनी असे नमूद केले आहे की, त्यांना त्यांचे पणजोबा श्री. गणेशमल रूपाजी बलार यांच्याकडून भेट व दान स्वरूपात १,९५७ ग्रॅम वजनाचे मौल्यवान वंशपरंपरागत दागिने व सोन्याचे दागिने प्राप्त झाले असून ते बँक ऑफ बडोदा - डोंबिवली शाखेतील लॉकर क्र. २६७ मध्ये ठेवण्यात आले होते. संबंधित अर्जदारांनी बचत बँक खात्यावरील तसेच सुरक्षित ठेव लॉकरवरील जप्ती उठविण्यात यावी आणि बचत खात्याशी संलग्न असलेल्या सुरक्षित ठेव लॉकरचे संचालन करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी प्रार्थना केली होती. मा. विभागीय सहनिबंधकांनी त्यांच्या दि. १६ ऑक्टोबर २००३ रोजीच्या आदेशाद्वारे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५६ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम १०७ अंतर्गत पारित करण्यात आलेल्या दि. १७ सप्टेंबर २००३ च्या जप्ती आदेशास स्थगिती दिली आणि पुढे बँक ऑफ बडोदा, डोंबिवली (पूर्व) शाखेतील लॉकर क्र. २६७ तसेच बचत बँक खाते क्र. २५५४९ वरील लादलेली जप्ती उठविण्याचा आदेश दिला. मा. विभागीय सहनिबंधकांनी तत्काळ दि. २२ ऑक्टोबर २००३ रोजी पुन्हा आदेश पारित करून बँक ऑफ बडोदा - डोंबिवली (पूर्व) शाखेतील सुरक्षित ठेव लॉकर क्र. २६७ तसेच बचत बँक खाते क्र. २५५४९ वरील जप्ती उठविण्याचे आणि त्यांचा शांततापूर्ण ताबा अर्जदारांना देण्याचे निर्देश दिले. तसेच, सदर आदेशाचे पालन न झाल्यास, बँक ऑफ बडोदा - डोंबिवली (पूर्व) शाखेस सदर सोन्याचे दागिने / अलंकार अर्जदारांच्या ताब्यात देण्याचे स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले.

आर. सी. धारक बँकेने मा. विभागीय सहनिबंधक यांच्या दि. १६ ऑक्टोबर २००३ व त्यानंतरच्या दि. २२ ऑक्टोबर २००३ च्या आदेशांना आव्हान देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ७१८१/२००३ दाखल केली. मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि. ४ नोव्हेंबर २००३ रोजीच्या आदेशाद्वारे विभागीय सहनिबंधकांचे दि. १६ ऑक्टोबर २००३ व त्यानंतरचे दि. २२ ऑक्टोबर २००३ चे आदेश रद्द व बाजूला ठेवले आणि पुनर्विलोकन अर्ज क्र. ७२५/२००३ हा गुण-दोषांच्या आधारे त्या दिवसापासून सहा महिन्यांच्या आत निकाली काढण्याचे निर्देश विभागीय सहनिबंधकांना दिले. मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि. ४ नोव्हेंबर २००३ रोजीच्या आदेशाद्वारे पुनर्विलोकन अर्ज क्र. ७२५/२००३ हा गुण-दोषांच्या आधारे निकाली काढण्यासाठी परत पाठविल्यानंतर, मा. विभागीय सहनिबंधकांनी त्यांच्या दि. ३१ जानेवारी २००४ रोजीच्या आदेशाद्वारे विशेष वसुली अधिकाऱ्यांनी दि. १७ सप्टेंबर २००३ रोजी पारित केलेला जप्ती आदेश, अर्जदारांच्या मालकीचे व बँक ऑफ बडोदा, डोंबिवली (पूर्व) शाखेतील लॉकर क्र. २६७ मध्ये ठेवलेले दागिने/सोन्याचे अलंकार यांच्याशी संबंधित जप्तीच्या बाबतीत, रद्द व बाजूला ठेवला. सदर जप्ती अंशतः उठविण्यात आली असून, बँक ऑफ बडोदा - डोंबिवली (पूर्व) शाखेने श्री. गणेशमल रूपाजी बलार यांनी केलेल्या मृत्युपत्रात नमूद केलेल्या वजनाच्या मर्यादेपर्यंत दागिने/सोन्याचे अलंकार यांची यादी तयार करून ते अर्जदारांच्या ताब्यात देण्याबाबत आदेश देण्यात आला.

बँकेने मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दि. ३१ जानेवारी २००४ रोजी पारित केलेल्या वादग्रस्त आदेशास आव्हान देण्यासाठी दि. १९ मार्च २००४ रोजी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. २९०१/२००४ दाखल केली. मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि. २४ मार्च २०२६ रोजी पुनर्विलोकन अर्ज क्र. ७२५/२००३ मधील मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दि. ३१ जानेवारी २००४ रोजी पारित केलेला आदेश रद्द व बाजूला ठेवला. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशामुळे बाधित झालेल्या संबंधित अर्जदारांनी दि. २४ मार्च २०२६ रोजीच्या आदेशास स्थगित स्थिती देण्याकरिता रिट याचिका क्र. २९०१/२००४ मध्ये पुनर्विलोकन याचिका (एस.टी.) क्र. ९८२२/२०२६ दाखल केली. सदर पुनर्विलोकन याचिका मा. उच्च न्यायालयाने दि. २१ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे फेटाळून लावली.

तथापि, दि. २८/०२/२०२६ रोजीपर्यंत वरील न्यायनिर्णय कर्जदारांकडून एकूण रु. ३,६६,१९,६२४.८५/- इतकी प्रचंड डिक्री रक्कम अद्याप वसूल होणे बाकी आहे आणि त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सदर थकबाकीची परतफेड करण्यासाठी कोणतीही पुढाकार घेतलेला नाही. त्यामुळे, वरील प्रचंड डिक्री रकमेची वसुली करण्यासाठी व ती रक्कम कमी करण्याच्या उद्देशाने सदर सोन्याचे दागिने व अलंकार यांची विक्री/विल्हेवाट लावणे आवश्यक व योग्य ठरत आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता, संबंधित अर्जदार तसेच संबंधित जजमेंट डेब्टर्स यांनी कोणतीही टाळाटाळ न करता, आर. सी. धारक बँकेच्या वांद्रे (पश्चिम) शाखेतील लॉकर क्र. १८०, ज्यामध्ये वरील सोन्याचे दागिने व अलंकार ठेवलेले आहेत, त्याच्या चाव्या घेऊन दि. १८.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून उपस्थित राहावे. सदर सोन्याचे दागिने व अलंकार यांची यादी (खर्पीशपीॲू) तयार करून, आर. सी. धारक बँकेच्या अधिकाऱ्यांच्या तसेच पंचांच्या उपस्थितीत आणि आर. सी. धारक बँकेने मान्यताप्राप्त सुवर्ण मूल्यनिर्धारकाच्या मार्फत त्यांची सत्यता व प्रामाणिकता पडताळून, त्यांचा शांततापूर्ण ताबा वसुली अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करावा. आर. सी. धारक बँकेच्या वांद्रे (पश्चिम) शाखेचा पत्ता - तळमजला, आय.ई.एस. मॅनेजमेंट कॉलेज, विश्वकर्मा गेट क्र. १, लिलावती हॉस्पिटल समोर, बांद्रा रिक्लेमेशन, बांद्रा (पश्चिम), मुंबई - ४०० ०५०. दि.१८.०६.२०२६ रोजी सोन्याचे दागिने व अलंकार यांचा शांततापूर्ण ताबा सुपूर्द करण्याबाबतच्या वरील निर्देशांचे पालन करण्यात अपयश आल्यास, सदर अधिकाऱ्यांकडे संबंधित उत्पादक कंपनीची मदत घेऊन लॉकर ड्रिल करून उघडण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लक राहणार नाही.

सदर लॉकर ड्रिल करून उघडण्यास लागणारा सर्व खर्च संबंधित अर्जदार आणि न्यायनिर्णय कर्जदार यांनी वहन करावयाचा आहे. ही बाब जनहितार्थ नोंद घ्यावी.

वरील सर्व अटी व शर्तीचे कोणत्याही प्रकारचा भंग न करता काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

माझ्या हस्ते व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी, मुंबई येथे, बुधवार दि. २७ मे २०२६ रोजी दिले.

सही/-
वसुली अधिकारी
(एमसीएस कायद्याचे कलम १५६ व नियम १०७ अन्वये)
shraddha.amaldar@greaterbank.com
vinodkumar.guram@greaterbank.com

जाहीर सूचना
शेअर प्रमाणपत्र गहाळ

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्रपाली सहकारी गृहनिर्माण संस्था लि., सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७ येथील खोली क्रमांक डी-४५, भूखंड क्रमांक २०३ शी संबंधित शेअर प्रमाणपत्र गहाळ/हरवले आहे.

सदर शेअर प्रमाणपत्र गहाळ झाल्याबाबत चारकोप पोलीस ठाण्यात गहाळ तक्रार क्रमांक ६६८०९-२०२६ दिनांक २०/०५/२०२६ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त, सदर फ्लॅटमधील ५०% हिस्सा, हक्क, मालकी आणि हितसंबंध श्रीमती सुरेखा भास्कर राय यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आले आहेत. सदर ५०% हिश्श्याच्या संदर्भातील म्हाडा हस्तांतरण आधीच पूर्ण झाले आहे. संस्थेच्या शेअर प्रमाणपत्रात श्रीमती सुरेखा भास्कर राय यांचे नाव समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर शेअर प्रमाणपत्र आणि/किंवा उपरोक्त हस्तांतरणासंदर्भात कोणताही दावा, हक्क, मालकी, हितसंबंध, आक्षेप किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला याद्वारे विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, सहाय्यक कागदपत्रांसह, अधोस्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला लेखी स्वरूपात कळवावे.

असे न केल्यास, असे गृहीत धरले जाईल की त्यासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा कोणताही आक्षेप किंवा दावा नाही, आणि सोसायटी दुय्यम शेअर प्रमाणपत्र जारी करण्याची, हस्तांतरणाची नोंद करण्याची, आणि त्यानुसार शेअर प्रमाणपत्रात श्रीमती सुरेखा भास्कर राय यांचे नाव समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यास स्वतंत्र असेल. उपरोक्त कालावधीनंतर प्राप्त झालेले दावे किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

सही/-
वकील श्रीमती प्रज्ञा गोरे
Email id :pradnyagore31@gmail.com

जाहीर सूचना

याद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझ्या अशील **सौ. माधुरी विजय भोसले** या फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, ए विंग, क्षेत्रफळ ४५.५३ चौ. मीटर (बिल्ट-अप क्षेत्र), साई धाम नावाच्या इमारतीतील व साईधाम बी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. **(नोंदणी क्र.टीएनए/व्हीएसआय/एचएसजी/(टीसी)/१७५३४/२००६-०७)** या सोसायटीतील सदनिकेच्या पूर्ण व निर्विवाद मालक आहेत, जे गाव नवघर, समर्थ रामदास नगर, वसई (पूर्व), तालुका वसई, जिल्हा पालघर, पिन क्र. ४०१२०२ येथे स्थित असून, सर्व्हे क्र. ३२, हिस्सा क्र. पार्ट लेआउट, प्लॉट क्र. ३१ व ३२ या जमिनीवर बांधलेला आहे (उपनोंदणी कार्यालय वसई क्र. १ ते ६ यांच्या कार्यक्षेत्रात येणारा) (यापुढे संक्षिप्ततेसाठी एकत्रितपणे सदर फ्लॅट असा उल्लेख करण्यात येईल).

आणि अशा सदस्य म्हणून हस्तांतरकर्ता यांना सदर सोसायटीचे भाग प्रमाणपत्र क्र. ०८ अंतर्गत अनुक्रमांक ३६ ते ४० असलेले प्रत्येकी रु. ५०/- चे पाच (५) समभाग धारण करण्याचा हक्क आहे (यापुढे संक्षिप्ततेसाठी एकत्रितपणे सदर समभाग असा उल्लेख करण्यात येईल). सदर मालमत्ता प्रत्यक्षात **१) दिवंगत विजय अनंत भोसले आणि २) सौ. माधुरी विजय भोसले** यांची मालकीची असून त्यांनी ती मे. श्री साई डेव्हलपर्स यांच्याकडून (ज्यांचा पुढे डेव्हलपर्स असा उल्लेख करण्यात आला आहे) खरेदी केली होती, यासंबंधीचा दस्तऐवज उपनिबंधक, वसई-१ यांच्या कार्यालयात दस्त क्र.वसई-१-४२६५-२००४, दिनांक २२.०७.२००४ अन्वये विधिपूर्वक नोंदणीकृत आहे.

तसेच दिवंगत विजय अनंत भोसले यांचे दि. ०५.०२.२०१७ रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले, त्यांच्या पश्चात **१) सौ. माधुरी विजय भोसले (मयताची पत्नी), २) कु. श्रुतिका विजय भोसले उर्फ सौ. श्रुतिका अमित शिंदे (मयताची विवाहित मुलगी), ३) श्री. श्रीकांत विजय भोसले (मयताचा मुलगा)** हे कायदेशीर वारस आहेत.

तसेच, **१) कु. श्रुतिका विजय भोसले उर्फ सौ. श्रुतिका अमित शिंदे (मयताची मुलगी) आणि २) श्री. श्रीकांत विजय भोसले (मयताचा मुलगा)** यांनी वरील सदनिकेमधील दिवंगत विजय अनंत भोसले यांच्या ५०% हिस्स्याचे हस्तांतरण सौ. माधुरी विजय भोसले (मयताची पत्नी) यांच्या नावे करण्यासाठी त्यांचे प्रतिज्ञापत्र, ना हरकत प्रमाणपत्र व संमतीपत्र दिले आहे.

दिवंगत विजय अनंत भोसले यांच्या निधनानंतर, **सौ. माधुरी विजय भोसले (मयताची पत्नी)** यांनी **दिवंगत विजय अनंत भोसले** यांचा सदर फ्लॅटमधील अविभाजित हक्क, शिर्षक व हितसंबंध असलेला ५०% हिस्सा त्यांच्या स्वतःच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी सदर सोसायटीस संमती दिली आहे. त्यानुसार सदर सोसायटीने सदर फ्लॅट व त्यासंबंधित समभाग सौ. माधुरी विजय भोसले यांच्या नावे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच सौ. माधुरी विजय भोसले या सदर फ्लॅटच्या आधीपासूनच ५०% हिस्स्याच्या सह-मालक आहेत.

आता **सौ. माधुरी विजय भोसले (मयताची पत्नी)** या वरील सदर फ्लॅटमधील १००% हिस्स्याच्या संपूर्ण व निर्विवाद मालक आहेत.

वारसा हक्काच्या कायद्यानुसार तसेच हिंदू वारसा अधिनियम, १९५६ च्या तरतुदींनुसार, माझ्या अशील **सौ. माधुरी विजय भोसले** या मयताच्या इस्टेटीच्या वारसदार म्हणून सदर मालमत्तेतील १००% हिस्सा प्राप्त करून त्याच्या संपूर्ण व कायदेशीर मालक झालेल्या आहेत.

ज्या कोणास वरील नमूद फ्लॅटसंदर्भात कोणताही हक्क, शिर्षक, हितसंबंध, धारणाधिकार, कर्जहक्क किंवा इतर कोणत्याही प्रकारचा दावा अथवा हिस्सा असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून **१५ दिवसांच्या** आत त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ प्रमाणित कागदपत्रांच्या प्रतींसह आपला हरकतीचा दावा खाली नमूद केलेल्या पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधून सादर करावा, अन्यथा, माझ्या अशिला सदर फ्लॅटवर वारसा हक्काने अधिकार प्राप्त करण्यास पात्र असल्याचे गृहीत धरले जाईल व भविष्यातील सर्व पत्रव्यवहार माझ्या अशिलांच्या फायद्यास अनुसरून करण्यात येतील. तसेच, या नोटीस कालावधी संपल्यानंतर कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

सही/-
एम.एम. शाह वकील उच्च न्यायालय
दुकान क्र.०४, 'डी' विंग, श्रीदत्त गार्डन के ॲव्हेन्यू, ब्ल्यू पर्ल इमारतीजवळ, क्लब वन जवळ, ग्लोबल सिटी, नारंगी बाय पास रोड, विरार (पश्चिम) - ४०१३०३.
मोबा.क्र.:८८०५००७८६६/८६६८७८६४९७
दिनांक: ०३.०६.२०२६ — **ठिकाण: मुंबई**

स्वस्तिका इन्व्हेस्टमार्ट लिमिटेड

सीआयएन: एल६५९१०एमएच१९९२पीएलसी०६७०५२
नोंदणी कार्यालय: कार्यालय क्र.१०४, १ला मजला, केशवा कमर्शियल इमारत, प्लॉट क्र.सी-५, ई ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, जीएसटी भवन समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०००५१. ।
दूर.:०७३१-६६४४००० । **ईमेल:** info@swastika.co.in । **वेबसाइट:** www.swastika.co.in

३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभा, ई-मतदान, नोंदणीची तारीख आणि लाभांश यासंबंधी माहितीची सूचना

हे आमच्या २५ मे, २०२६ रोजीच्या पूर्वीच्या पत्रक प्रकाशनाच्या अनुषंगाने आहे, ज्याद्वारे कंपनीच्या सदस्यांना कळविण्यात आले होते की, कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या तरतुदींचे पालन करून, सहकार मंत्रालय (एमसीए) आणि भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (सेबी) यांनी जारी केलेल्या परिपत्रकांसह, संचालक मंडळाने २ मे, २०२६ रोजीच्या सूचनेत नमूद केल्यानुसार कामकाज पार पाडण्यासाठी, कंपनीची ३४वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **गुरुवार, २५ जून, २०२६ रोजी दु.१२.३०वा.(भाप्रवे)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर दृकश्राव्य माध्यमे (ओएव्हीएम) सुविधेद्वारे आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर एमसीए आणि सेबी परिपत्रकांनी कंपन्यांना, भागधारकांना वार्षिक अहवालांच्या छापील प्रती छापून पाठवण्याबाबत सवलत दिली आहे. कोणताही सदस्य info@swastika.co.in या ईमेलवर कंपनीला विनंती पाठवून अहवालाच्या छापील प्रतीची मागणी करू शकतो.

एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांनुसार ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) कडे नोंदणीकृत होते, त्या सर्व सदस्यांना **मंगळवार, २ जून, २०२६** रोजी ई-मेलद्वारे ३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, तसेच ई-मतदानासह व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सामील होण्यासाठीचे लॉगिन तपशील पाठवण्यात आले आहेत आणि ते कंपनीच्या वेबसाइटवर (www.swastika.co.in), स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर (www.bseindia.com) आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) च्या वेबसाइटवर (www.evotingindia.com) देखील उपलब्ध आहेत. पुढे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या सुधारित नियम ३६ नुसार, ज्या भागधारकांनी कंपनीकडे नोंदणीकृत पत्त्यावर त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटद्वारे एक पत्र पाठवण्यात आले आहे, ज्यामध्ये वार्षिक अहवालाचा संपूर्ण तपशील उपलब्ध असलेल्या अचूक मार्गासह वेब लिंक समाविष्ट आहे.

कंपनीने वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाल्यास, ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी अंतिम लाभांशासाठी सदस्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी **गुरुवार, १८ जून, २०२६** ही रेकॉर्ड तारीख निश्चित केली आहे. ज्या सदस्यांनी त्यांच्या बँक खात्याचा तपशील अद्ययावत केला आहे, त्यांना अंतिम लाभांश विविध ऑनलाइन हस्तांतरण पद्धतींद्वारे दिला जाईल.

पुढे कृपया नोंद घ्यावी की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन १२ मध्ये **१९ नोव्हेंबर, २०२५** पासून लागू झालेल्या सुधारणेनुसार, ज्या भागधारकांच्या बँक खात्याचा तपशील अद्ययावत केलेला नाही, त्यांना कंपनी भौतिक साधनांद्वारे लाभांश देऊ शकणार नाही. अशा सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी डिमॅट स्वरूपात असलेल्या शेअर्सच्या बाबतीत डीपीकडे किंवा भौतिक स्वरूपात असलेल्या शेअर्सच्या बाबतीत आरटीएकडे, आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म आयएसआर १, आयएसआर २ आणि एसएच १३ सादर करून त्यांच्या बँक खात्याचा तपशील नोंदवावा.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदींनुसार, वेळोवेळी सुधारित केलेल्या कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० सह, सेबी (एलओडीआर) नियमावलीच्या नियम ४४ आणि द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेल्या सर्वसाधारण सभांवरील सेक्रेटरियल स्टँडर्ड-२ नुसार, कंपनी आपल्या सदस्यांना ३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिनांक २ मे, २०२६ रोजीच्या सूचनेत नमूद केलेल्या अजेंडा आयटमवर, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) द्वारे प्रदान केलेल्या ई-व्होटिंग सेवांमार्फत रिमोट ई-व्होटिंग (एजीएम पूर्वी) आणि ई-व्होटिंग (एमजीएम दरम्यान) द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याचा अधिकार वापरण्याची सुविधा प्रदान करत आहे.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदी आणि त्याअंतर्गत विहित केलेल्या संबंधित नियमांनुसार तपशील खालीलप्रमाणे आहे:-

१. कामकाज इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाच्या माध्यमातून पार पाडले जाईल.
२. दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख आणि वेळ: **सोमवार, २२ जून, २०२६ रोजी स.०९.००वा. पासून.**
३. दूरस्थ ई-मतदान समाप्तीची तारीख आणि वेळ: **बुधवार, २४ जून, २०२६ रोजी सायं.५.००वा.**
४. अंतिम तारीख: **गुरुवार, १८ जून, २०२६.**
५. कोणतीही व्यक्ती, जी नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स मिळवते आणि कंपनीची सदस्य झाली आहे आणि कट-ऑफ तारखेला अर्थात **गुरुवार, १८ जून, २०२६** रोजी शेअर्स धारण करते, ती ३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन करून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.
६. **बुधवार, २४ जून, २०२६ रोजी सायं.५.००वा.** नंतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ई-मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही, कारण ही सुविधा तात्काळ बंद केली जाईल.
७. वार्षिक सर्वसाधारण सभेत इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल आणि सभेला उपस्थित असलेल्या ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाने आपले मत नोंदवलेले नाही, त्यांना सभेत ई-मतदानाद्वारे आपला मतदानाचा हक्क बजावता येईल.
८. ज्या सदस्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाने आपले मत नोंदवले आहे, ते वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क असणार नाही.
९. कट-ऑफ तारखेला भौतिक स्वरूपात किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे कंपनीचे सदस्यच दूरस्थ ई-मतदान तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी मतदान करण्याच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असतील.
१०. एकदा सदस्याने ठरावावर मत दिल्यानंतर, त्याला/तिला नंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.
११. ३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइट www.swastika.co.in वर आणि सीडीएसएलच्या वेबसाइट www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.
१२. इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करण्याच्या सुविधेसंबंधी सर्व तक्रारी **श्री. राकेश दळवी,** सहाय्यक उपाध्यक्ष, (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, माफतलाल मिल कंपाऊंड्स, एन एम जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई-४०००१३ येथे पाठवाव्यात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवावा किंवा १८००२१०९९११ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करावा.

सेबीने आपल्या ३० जानेवारी, २०२६ रोजीच्या अद्ययावत परिपत्रक एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ अन्वये, गुंतवणूकदारांना ०५ फेब्रुवारी, २०२६ ते ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक विशेष एक वर्षाची मुदत दिली आहे, ज्याद्वारे ते १ एप्रिल, २०१९ पूर्वी सादर केलेले, परंतु त्रुटींमुळे नाकारलेले, परत केलेले किंवा ज्यावर प्रक्रिया न झालेले जुने प्रत्यक्ष शेअर हस्तांतरण करार पुन्हा सादर करू शकतील.

मंडळाच्या आदेशान्वये
स्वस्तिका इन्व्हेस्टमार्ट लिमिटेडकरिता
सही /-
शिखा अग्रवाल
ठिकाण: मुंबई — कंपनी सचिव व सक्षम अधिकारी
दिनांक: ०३.०६.२०२६ — **एसीएस:** ३६५२०

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, माझे पक्षकार १) श्री. संजय विद्याधर वाझंदर, २) श्री. विशाल संजय वाझंदर आणि ३) श्री. अभिनव संजय वाझंदर, अनुसूचित मालमत्तांचे संयुक्त मालक, यांनी खालील मूळ कागदपत्रे गमावली आहेत / गहाळ केली आहेत;

फ्लॅट क्र.ए-२०१ च्या बाबतीत

अ) **लोखंडवाला कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीज प्रा. लि.** यांनी **१) श्रीमती चांदनी विजय शाह** आणि **२) श्री. विजय आर. शाह** यांच्या नावे दिनांक २१ ऑगस्ट, १९९१ रोजी जारी केलेले/अंमलात आणलेले वाटप पत्र/वाटप करारनामा.

ब) दिनांक २२ फेब्रुवारी, १९९४ रोजी **१) श्रीमती चांदनी विजय शाह** आणि **२) श्री. विजय आर. शाह** आणि **१) श्री. पंकज जे. शाह, २) श्री. रवींद्र जे. शाह** आणि **३) श्री. नरेश जे. शाह** यांच्यात केलेला आणि नोंदवलेला करारनामा.

क) दिनांक १५ मार्च, १९९४ रोजी **१) श्री. पंकज जे. शाह, २) श्री. रवींद्रराज. शाह** आणि **३) श्री. नरेश जे. शाह** आणि **१) श्रीमती निवेदितादिल मसानी** आणि **२) श्रीमती अनघा एस. वाझनदार (मयत)** यांच्यात केलेला आणि नोंदवलेला करारनामा.

सर्व संबंधित मुद्रांक, पावत्या, मुद्रांक शुल्काच्या पावत्या, नोंदणी शुल्काच्या पावत्या इत्यादींसह.

फ्लॅट क्र.ए-२०१ विरुद्ध वाटप केलेल्या स्टिल्ट पार्किंगच्या बाबतीत

अ) **लोखंडवाला कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीज प्रा. लि.** यांनी **श्री. अचरतलाल वर्धिलाल शाह** यांच्या नावे दिनांक ०६ जुलै, १९९३ रोजी केलेल्या वाटप पत्र/वाटप करारासंबंधीची मुद्रांक शुल्क भरल्याची पावती.

ब) **श्री. अचरतलाल वर्धिलाल शाह** आणि **१) श्रीमती निवेदिता आदिल मसानी** व **२) श्रीमती अनघा एस. वाझनदार (मयत)** यांच्यात दिनांक १३ डिसेंबर, १९९४ रोजी झालेल्या करारासंबंधीची मुद्रांक शुल्क भरल्याची पावती.

फ्लॅट क्र.ए-२०२ च्या बाबतीत

अ) **लोखंडवाला कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीज प्रा. लि.** यांनी **१) कुमारी लक्ष्मी आर. शाह** आणि **२) श्री. रतीलाल पी. शाह** यांच्या नावे दिनांक २१ ऑगस्ट, १९९१ रोजी जारी केलेले/अंमलात आणलेले वाटप पत्र/वाटप करारनामा.

ब) **१) कुमारी लक्ष्मी आर. शाह** आणि **२) श्री. रतीलाल पी. शाह** आणि **श्री. जी. एल. दतवाणी** यांच्यात झालेला आणि नोंदणीकृत केलेला दिनांक १४ फेब्रुवारी, १९९४ रोजीचा करारनामा.

क) **श्री. जी. एल. दतवाणी** आणि **१) श्रीमती अनघा एस. वाझनदार (मयत)** आणि **२) श्रीमती निवेदिता आदिल मसानी** यांच्यात झालेला आणि नोंदणीकृत केलेला दिनांक १५ मार्च, १९९४ रोजीचा करारनामा.

सर्व संबंधित मुद्रांक, पावत्या, मुद्रांक शुल्काच्या पावत्या, नोंदणी शुल्काच्या पावत्या इत्यादींसह.

फ्लॅट क्र.ए-२०२ विरुद्ध वाटप केलेल्या स्टिल्ट पार्किंगच्या बाबतीत

अ) **लोखंडवाला कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीज प्रा. लि.** आणि **श्रीमती जमेर कौर कल्याण** यांच्यात दिनांक ४ जून, १९९२ रोजी केलेले वाटप पत्र/वाटप करारनामा, मुद्रांक शुल्क भरणा पावतीसह.

ब) **श्रीमती जमेर कौर कल्याण** आणि **१) श्रीमती अनघास. वाझनदार (मयत)** व **२) श्रीमती निवेदिता आदिल मसानी** यांच्यात दिनांक १२ डिसेंबर, १९९४ रोजी केलेल्या करारनामाच्या संदर्भातील मुद्रांक शुल्क भरणा पावती.

यापुढे ''सदर दस्तऐवज'' म्हणून संबोधले जाईल.

माझे अशील घोषित करतात की, **श्रीमती अनघा एस. वाझनदार (मयत)** या **श्रीमती निवेदिता आदिल मसानी** यांच्यासोबत अनुसूचित मालमत्तेच्या संयुक्त मालक होत्या. सदर **श्रीमती अनघा एस. वाझनदार** यांचे १० जुलै, २०१० रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे पती **१) श्री. संजय विद्याधर वाझनदार** आणि त्यांची मुले **२) श्री. विशाल संजय वाझनदार** व **३) श्री. अभिनव संजय वाझनदार** अर्थात माझे अशील हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार आणि उत्तराधिकारी आहेत.

असे की, सदर **१) श्री. विशाल संजय वाझनदार** आणि **२) श्री. अभिनव संजय वाझनदार** यांनी अनुसूचित मालमत्तेमधील आपला अविभाजित हिस्सा **श्री. संजय विद्याधर वाझनदार** अर्थात **माझे अशील क्र.१** यांच्या नावे आणि त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी एक नोंदणीकृत विमोचनपत्र निष्पादित केले आहे. दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजीच्या नोंदणीकृत दानपत्राद्वारे **श्रीमती निवेदिता आदिल मसानी** यांनी अनुसूचित मालमत्तेमधील त्यांचा ५०% अविभाजित हिस्सा **२) श्री. विशाल संजय वाझनदार** आणि **३) श्री. अभिनव संजय वाझनदार** अर्थात **माझे अशील क्र.२** आणि **३** यांना दान केले आहे.

अनुसूचित मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात, वारसा, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, धारणाधिकार, ताबा, जप्ती, प्रलंबित खटला, गहाण, भागीदारी, भार, बक्षीस, बोजा किंवा इतर कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा हक्क, अधिकार, मागणी किंवा दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर दावा व त्यास पुष्टी देणाऱ्या सर्व कागदपत्रांच्या प्रती या सूचनेच्या प्रकाशनापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** कालावधीत स्वाक्षरीकर्त्यास कळवाव्यात. असे करण्यात कसूर झाल्यास, अशा व्यक्तीचा/संस्थेचा/पेढीचा कोणताही दावा असल्यास त्यांनी सोडून दिला आहे असे मानले जाईल; तसेच तो दावा माझ्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यानंतर माझा अशील सदर मालमत्तेचे शीर्षक हे विक्रीयोग्य आणि सर्व प्रकारच्या बोज्यांपासून मुक्त आहे, या आधारावर पुढील कार्यवाही करण्यास मोकळा राहील.

मालमत्तेची अनुसूची

अ. **फ्लॅट क्र.ए-२०१**, क्षेत्रफळ ६६० चौ.फु. बिल्टअप क्षेत्र, २रा मजला, तसेच स्टिल्ट पार्किंग क्र.१२ सह, ॲलिस नगर इमारत क्र.१० सहकारी गृहनिर्माण संस्था लि. म्हणून ज्ञात इमारत, सेक्टर २, प्लॉट सी, लोखंडवाला टाऊनशिप, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.

ब. **फ्लॅट क्र.ए-२०२**, क्षेत्रफळ ५२५ चौ.फु. बिल्टअप क्षेत्र, २रा मजला, तसेच स्टिल्ट पार्किंग क्र.१२ सह, ॲलिस नगर इमारत क्र.१० सहकारी गृहनिर्माण संस्था लि. म्हणून ज्ञात इमारत, सेक्टर २, प्लॉट सी, लोखंडवाला टाऊनशिप, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.

जुने सीटीएस क्र.१७६(भाग), १८०(भाग), १९८(भाग) आणि १९९(भाग) आणि नवी सीटीएस क्र.१७१/१९, गाव आकुर्ली, तालुका बोरिवली, मुंबई जिल्हा येथील दोन्ही जागेचे सर्व भाग व खंड.

आज दिनांकीत २ जून, २०२६ — **सही/-**
आर. जे. चोथानी (वकील)
डी-१०३/१०४, अंबिका दर्शन, सी.पी. रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.

इनोव्हा कॅपटॅब लिमिटेड

innova CAPTAB

सीआयएन: L24246MH2005PLC150371
नोंदणीकृत कार्यालय: १५१३, १५ वा मजला, सत्र प्लाझा, सीएचएस लि. प्लॉट क्रमांक १९ आणि २०, सेक्टर १९ डी, वाशी, नवी मुंबई, ४००७०३, महाराष्ट्र, भारत **फोन:** +९१ २२ ६७९४ ४०००
वेबसाइट: https://www.innovacaptab.com
मेल: investors@innovacaptab.com

कंपनीच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाबाबत माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, इनोव्हा कॅप्टॅब लिमिटेड (कंपनी) ची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **सोमवार, २९ जून २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता (भाप्रवे)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर दृकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम) द्वारे कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत येणारे नियम (कायदा), आणि वेळोवेळी सुधारित केलेले सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स) याच्यासह वाचलेले कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए परिपत्रके) आणि सिक्युरीटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी जारी केलेल्या परिपत्रकांच्या अधीन राहून आयोजित केली जात असून एजीएमच्या सूचनेमध्ये (सूचना) नमूद केलेले कामकाज पूर्ण केले जाणार आहे.

एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांचे पालन करून, एजीएमची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा एकत्रित वार्षिक अहवाल योग्य वेळी फक्त इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ई-मेलद्वारे पाठवला जाईल. हा अहवाल अशाच सभासदांना पाठवला जाईल ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी, रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) म्हणजेच एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड, किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपेंट्स (डिपी) कडे नोंदणीकृत आहेत. ज्या समभागधारकांचे ई-मेल आयडी कंपनी/डीपी/डिपॉझिटरीज/आरटीएकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांना पत्र पाठवले जाणार असून सदर पत्रामध्ये वार्षिक अहवाल डाउनलोड करण्यासाठी वेबसाइटची थेट लिंक दिली जाईल. याशिवाय, एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाइट: www.innovacaptab.com, शेअर बाजारांच्या वेबसाइट्स म्हणजेच बीएसई लिमिटेडची www.bseindia.com आणि एनएसई लिमिटेडची www.nseindia.com तसेच ई-वोटिंग एजन्सीची वेबसाइट म्हणजेच नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (एनएसडीएल) ची वेबसाईट येथे उपलब्ध आहे. एजीएमला ऑनलाइन उपस्थित कसे राहायचे, तसेच रिमोट ई-वोटिंगफ्द्वारे किंवा सभेदरम्यान ई-वोटिंगद्वारे मतदान कसे करायचे, याची सविस्तर माहिती आणि प्रक्रिया एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केलेली असेल.

दूरस्थ ई-मतदान करण्याची सुविधा खालील नमूद कालावधीत उपलब्ध असणार आहे:

ई-मतदानाचा प्रारंभ: शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता (भाप्रवे)

ई-मतदानाची समाप्ती: रविवार, २८ जून २०२६ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता (भाप्रवे)

ज्या व्यक्तीचे नाव अंतिम तारीख **(कट-ऑफ डेट) सोमवार, २२ जून २०२६** रोजी कंपनीच्या सभासदांच्या नोंदवहीत किंवा लाभार्थी मालकांच्या यादीत नोंदवलेले असेल, तीच व्यक्ती मतदान करू शकते.

कंपनीचे जे सभासद आहेत, ज्यांनी अजून त्यांचे ई-मेल आयडी किंवा बँके तपशील नोंदवले नाहीत, ते खालील प्रक्रियेचा वापर करून आपली नोंदणी करू शकतात:

कागदी स्वरुपातील	समभागधारकांनी विहित नमुन्यातील आयएसआर-१ फॉर्म आणि इतर संबंधित फॉर्म्स आवश्यक कागदपत्रांसह कंपनीच्या आरटीएकडे जमा करून आपली माहिती नोंदवावी किंवा अदयावत करावी. सेबीच्या १६ मार्च २०२३ च्या परिपत्रक क्र. SEBI/HO.MIRSD-PoD-१/P/CIR/२०२३/३७ नुसार, कंपनीने समभागधारकांची केवायसी माहिती अद्यावत करण्यासाठी सर्व संबंधित फॉर्म्स आपल्या वेबसाइटवर अपलोड केलेले आहेत. इन्व्हेस्टर सर्व्हिस रिक्वेस्ट फॉर्म कंपनीच्या https://www.innovacaptab.com/investor-Resources.php या वेबसाइटवरून डाउनलोड केला जाऊ शकतो. ज्या सभासदांकडे समभाग कागदी स्वरुपात आहेत किंवा ज्यांनी आपला ई-मेल आयडी कंपनी/डिपॉझिटरीकडे नोंदवलेला नाही, तसेच अशी कोणतीही व्यक्ती जिने कंपनीने नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचे समभाग खरेदी केले आहेत आणि ती कंपनीची सभासद बनली आहे, अशा सर्व व्यक्ती ज्यांच्याकडे कट-ऑफ डेट म्हणजेच सोमवार, २२ जून २०२६ रोजी समभाग असल्यास, ते ऑनलाइन मतदानासाठीचा युझर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. यासाठी त्यांना या वेबसाइटवर किंवा investors@innovacaptab.com या ई-मेल investors@innovacaptab.com आयडीवर विनंती अर्ज पाठवावा लागेल.
डिमॅट स्वरुपातील समभागांसाठी	तुमच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपेंटने दिलेल्या प्रक्रियेनुसार, तुमची माहिती तुमच्या डिमॅट खात्यामध्ये नोंदवा किंवा अद्यावत करा.

ई-मतदान करण्याची आणि एजीएमला उपस्थित राहण्याची पद्धत:

i) सभेच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांवर मतदान करण्यासाठी सभासदांना दोन संधी मिळतील. ते रिमोट ई-वोटिंगव्दारे किंवा एजीएम सुरू असताना ई- वोटिंगव्दारे मतदान करू शकतात.

ii) वर सांगितलेल्या प्रक्रियेनुसार तुमचा ई-मेल आयडी यशस्वीरीत्या नोंदणीकृत झाल्यानंतर, ई-मतदान करण्यासाठी लागणारा लॉगिन आयडी आणि पासवर्ड तुम्हाला ई-मेलद्वारे पाठवला जाईल.

iii) याच लॉगिन आयडी आणि पासवर्डचा वापर करून तुम्ही व्हीसी/ ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित राहू शकता.

iv) ई-वोटिंगद्वारे मतदान करण्याची सविस्तर पद्धत आणि नियम एजीएमच्या नोटीसमध्ये दिले जातील. तसेच ही माहिती कंपनीच्या वेबसाइटवर www.innovacaptab.com आणि एनएसडीएलची वेबसाइट www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध असेल.

सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सूचनेमध्ये दिलेले सर्व मुद्दे आणि विशेषतः व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सभेत कसे सहभागी व्हायचे, सभेपूर्वी 'रिमोट ई-वोटिंग' ने कसे मतदान करायचे आणि सभेदरम्यान कसे मतदान करायचे, याबाबतच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

इनोव्हा कॅप्टॅब लिमिटेडसाठी
सही/-
ठिकाण: पंचकुला — **नीहारिका शुक्ला**
दिनांक: ०३ जून, २०२६ — **कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**